# 'ग्रामालोक' सोमवारी

**औरंगाबाद :** साहित्य अकादमी विभागीय कार्यालय मुंबई यांच्या वतीने ग्रामीण भागात साहित्याची अभिरुची निर्माण वाढवण्यासाठी 'ग्रामालोक' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. जळगाव मेटे (ता. फुलंब्री) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत येत्या सोमवारी ( २६ ऑगस्ट) कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन कवी श्रीधर नांदेडकर करणार आहेत. यावेळी साहित्य अकादमीचे मुंबई विभाग सचिव कृष्णा किंबहुने उपस्थित असतील. तर निमंत्रितांच्या कविसंमेलनात कवी संदीप जगदाळे, वाल्मीक वाघमारे, सरदार जाधव, रवी कोरडे आणि श्रीधर नांदेडकर कविता सादर करणार आहेत.

# उद्यापासून मार्क्सवाद, मराठी साहित्यावर चर्चासत्राचे आयोजन

संभाजीनगर, दि. २२ (प्रतिनिधी)– साहित्य अकादमी आणि मराठवाडा साहित्य परिषदेच्या संयुक्त विद्यमाने २४ व २५ ऑगस्ट रोजी मसापच्या डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात दोनदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

२४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत उद्घाटन समारंभ होणार असून, यात साहित्य अकादमी, मुंबईचे प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहुने यांचे स्वागत भाषण, मराठी सल्लागार मंडळ व साहित्य अकादमीचे संयोजक रंगनाथ पठारे यांचे उद्घाटनाचे भाषण, मराठी समीक्षक हरिश्चंद्र थोरात यांचे बीजभाषण आणि साहित्यिक तथा निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचे अध्यक्षीय भाषण होणार आहे.

दुपारी १२ ते १.३० या वेळात होणाऱ्या पहिल्या सत्रात शरद नावरे यांच्या अध्यक्षतेखाली 'मार्क्स आणि साहित्य' या विषयावर चर्चासत्र होणार आहे. यात उदय रोटे, नितीन रिंढे हे मार्क्सच्या साहित्यावर विचार मांडणार आहेत. भोजन अवकाशानंतर दुपारी २.३० ते. ३.३० दरम्यान दुसऱ्या सत्रात साहित्य अकादमीचे मराठी सल्लागार मंडळाचे सदस्य राजन गवस यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी कथात्म साहित्य आणि मार्क्सवाद' या विषयावर दत्तात्रेय घोलप, प्रवीण बांदेकर विचार मांडतील.

दुसऱ्या दिवशी २५ रोजी भास्कर चंदनशिव यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी कथेतर साहित्य आणि मार्क्सवाद' या विषयावर आयोजित चर्चासत्रात धर्मकीर्ती सुमंत व यशपाल भिंगे, तर चौथ्या सत्रात हरिश्चंद्र थोरात यांच्या अध्यक्षतेखाली 'मराठी कविता, समीक्षा, कलामीमांसा आणि मार्क्सवाद' या विषयावर रणधीर शिंदे, शोभा नाईक, भ. मा. परसावळे हे मार्क्सवाद आणि मराठी कविता, समीक्षा व कलामीमांसा यावर भाष्य करतील.

चर्चासत्राचा समारोप कौतिकराव ठाले यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, यात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या व्याख्यानाने या चर्चासत्राचा समारोप होणार आहे.

या चर्चासत्रात साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन साहित्य अकादमी आणि मसापच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘मार्क्सवाद आणि मराठी साहित्य’ चर्चासत्र उद्या

**औरंगाबाद :** मराठवाडा साहित्य परिषद आणि साहित्य अकादमीच्या वतीने ‘मार्क्सवाद आणि मराठी साहित्य’ विषयावर दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. २४ आणि २५ ऑगस्ट रोजी ‘मसाप’च्या सभागृहात सकाळी १० ते दुपारी तीन या वेळेत चर्चासत्र होईल.

चर्चासत्राचे उदघाटन साहित्य अकादमीच्या मराठी सल्लागार मंडळाचे रंगनाथ पठारे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी समीक्षक हरिश्चंद्र थोरात, साहित्यिक नरेंद्र चपळगावकर, प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहुने व दादा गोरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दुपारी शरद नावरे यांच्या अध्यक्षतेखाली उदय रोटे (मार्क्सवादी साहित्य विचाराचे स्वरूप), नितीन रिंढे (मार्क्सचा साहित्य विचार) शोधनिबंध वाचणार आहेत. ‘मराठी कथात्म साहित्य आणि मार्क्सवाद’ या विषयावरील सत्रात राजन गवस यांच्या अध्यक्षतेखाली दत्तात्रय घोलप (मराठी कथा आणि मार्क्सवाद), प्रवीण बांदेकर (मराठी कादंबरी आणि मार्क्सवाद) शोधनिबंध वाचतील. रविवारी ‘मराठी कथेतर साहित्य आणि मार्क्सवाद’ या विषयावर भास्कर चंदनशिव यांच्या अध्यक्षतेखाली धर्मकीर्ती सुमंत (मराठी नाटक आणि मार्क्सवाद), यशपाल भिंगे (मराठी चरित्रे, आत्मचरित्रे आणि मार्क्सवाद) या विषयावर शोधनिबंध वाचतील. ‘मराठी कविता, समीक्षा, कलामीमांसा आणि मार्क्सवाद’ या विषयावर हरिश्चंद्र थोरात यांच्या अध्यक्षतेखाली रणधीर शिंदे (मराठी कविता आणि मार्क्सवाद), शोभा नाईक (मराठी समीक्षा आणि मार्क्सवाद), भ. मा. परसवाळे (कलामीमांसा आणि मार्क्सवाद) शोधनिबंध वाचणार आहेत.